| | |
|---|---|
| MHJN100000982026 | **निशाणी क्र.०१ खालील आदेश**<br>(पारीत दि. १८/०३/२०२६) |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार मयत नामे **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** हे अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील होते व ते **दिनांक १८/०१/२०१४** रोजी मौजे आकणी, ता. मंठा, जि. जालना येथे मयत झालेले आहेत. अर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आई व मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांच्या पत्नी नामे अन्नपूर्णा अंकुश मानवतकर यांचे दि. १५/०७/२०२० रोजी निधन झालेले असून मयतास अर्जदारांव्यतिरिक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. तरी अर्जदार हेच मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे कायदेशीर वारस आहेत. तरी अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता मयताच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी सदर अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक १२/०२/२०२६ रोजीच्या दैनिक **'जगमित्र'** आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार क्र. १ श्रीरंग अंकुश मानवतकर यांनी सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ८ वर दाखल केले व त्यांच्या सरतपासात त्यांनी अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. तसेच अर्जदार क्र. १ यांनी स्वतःच्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत निशाणी क्र. ९ वर दाखल केली आहे. अर्जदारांतर्फे कागदोपत्री पुराव्यामध्ये नि.क्र. १० ते ११ वर अर्जदार क्र. २ व ३ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. तसेच मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत नि. क्र. १२ वर दाखल केली आहे. नि.क्र. १३ वर अन्नपुर्णा अंकुश मानवतकर यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. नि.क्र. १४ वर दैनिक जगमित्र मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन दाखल केले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज विना उजर व आक्षेपविना राहिले आहे.

**५.** अर्जदारांनी नि.क्र. १५ वर पुरसीस दाखल करुन केवळ मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे. अर्जदारांतर्फे पुरावा बंद केल्याबाबतची पुरशिस निशाणी क्र. १६ वर दाखल केली आहे. संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे मुले असून तेच मयत नामे **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करीता खालील आदेश.

## आ दे श

१) अर्ज **मंजुर** करण्यात आला.

२) अर्जदार क्र. १ **श्रीरंग अंकुश मानवतकर,** अर्जदार क्र. २ **दिगंबर अंकुश मानवतकर,** अर्जदार क्र. ३ **दत्ता अंकुश मानवतकर** हे सर्व मयत **अंकुश नारायणराव मानवतकर** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.03.18 16:53:19 +0530

दिनांक– १८/०३/२०२६.

**(श्रीमती एल. पी. धन्वे)**
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर)
मंठा.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे– अक्षय ईश्वर देशपांडे

न्यायालयाचे नाव– दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर), मंठा

न्यायनिर्णयाची दिनांक – १८/०३/२०२६

स्वाक्षांकीत/–

लघुलेखक (नि.श्रे.)